# अहेरी नगरपंचायत अहेरी

## ता.अहेरी जि. गडचिरोली

सत्यमेव जयते

ईमेल -nagarpanchayataheri1@gmail.com

फोन नं.07133-299093

दिनांक :- 16/07/2025

जा.क्र./न.पं.अ/ /2025

प्रति,

संपादक

दैनिक सकाळ

विषय:- संलग्नित सुचना आपल्या अंकात राज्य स्तरावरील **एका** दैनिकात प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये संलग्नित सुचना दिनांक 17/07/2025 रोजी आपल्या राज्य स्तरावरील दैनिकात शासकीय दराने कमीत कमी जागेत प्रसिध्द करावी व प्रसिध्दी अंकाच्या पाच प्रती देयक्का सह कार्यालयात सादर करण्यात यावी जेणे करुण देयके अदा करणे सोयीचे होईल.

दिनांक:- 16/07/2025

ठिकाण:- अहेरी

नगर पंचायत कार्यालय, अहेरी

- स्वा-

(गणेश शहाणे, म.श.प्र.से )

मुख्याधिकारी

नगरपंचायत अहेरी

नगर पंचायत कार्यालय, अहेरी

# जाहीर प्रसिध्दीकरण

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समायोजित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडुन वाढत्या अपेक्षा विचारात घेवून त्यांना तत्पर व दर्जेदार पुरविण्याच्या दृष्टीकोणातुन महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश करण्यामागे दिनांक 28/04/2015 रोजी लागू करण्यात आला आहे. सदर अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने पूर्वी असलेल्या सेवा अधिनियमाअंतर्गत अधिसूचित करुन त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे. त्यामध्ये नगरपंचायत या नागरी स्थानिक संस्थांचा समावेश आहे. नागरी संस्थामार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा - सुविधापैकी नागरिक केंद्रबिंदू मानून नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणाऱ्या व ज्या लोकसेवांचा जास्तीत जास्त फायदा घेतलेला आहे व ज्या सेवा महत्वाच्या आहेत. अशा सेवा अध्यादेशाच्या कलम 3 (अ) नुसार अधिसूचित करण्याबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अएसीओ-2015/प्र.क्र.189/नवि14, दिनांक 23/06/2015 नुसार मा.शासनाने निर्णय घेतला आहे.

मा.शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार एकुण 70 सेवा स्थानिक प्राधिकरणांनी अध्यादेशाचे कलम 3(अ) नुसार अधिसूचित करावयाच्या आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश , 2015 कलम 3 अन्वये अधिसूचित करावयाच्या एकुण 70 लोकसेवांची सूची, आवश्यक कागदपत्र, फी, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व व्दितीय अपिलीय अधिकारी यांची यादी विवरणपत्र 01 अन्वये सोबत जोडली आहे.

(गणेश शहाणे, म.श.प्र.से )
मुख्याधिकारी
अहेरी नगरपंचायत,अहेरी